
Read India Books



# पुरी गेली पळून

झाकिर हुसेन

चित्रे पूजा पोट्टेनकुलम

RGF Pratham SERIES

Original story (Urdu) *Poori jo kadhai se nikal bhagi* by Zakir Husain
Marathi translation by Meera Tendolkar, © Rajiv Gandhi Foundation – Pratham Books, 2004
Illustrations by Pooja Pottenkulam © Zubaan, 2004

*Second Marathi Edition 2006 published by*

**Young Zubaan**
an imprint of Zubaan
K-92 Hauz Khas Enclave
New Delhi 110 016
zubaanwbooks@vsnl.net
www.zubaanbooks.com

*in association with Rajiv Gandhi Foundation and Pratham Books*
www.prathambooks.org

*All rights reserved*


No part of this publication may be reproduced, stored in a retrieval system, or transmitted in any form or by any means, electronic, mechanical, photocopying, recording or otherwise, without prior permission of the publishers.

ISBN 81-89013-51-3

*Printed in India by*
**Raj Press**
R-3 Inderpuri, New Delhi 110 012

# पुरी गेली पळून

झाकिर हुसेन




हे पुस्तक

______________________________

______________________________ चे आहे

8721

young zubaan



एका गावात एक शेतकरी आणि
त्याची बायको राहत होते.
शेतकऱ्याचे नाव मनसा आणि त्याच्या
बायकोचे गुडीया. मनसाकडे पैसे खूप
होते परंतु काम करण्यासाठी माणसे कमी होती.


म्हणून मनसाला सगळे काम नेहमी मजुरांकडून करून घ्यावे लागे. वैशाख महिना होता. मनसाच्या शेतात गहू खूप पिकला होता. त्याची कापणी सुद्धा झाली होती.

आता मळणी करून दाणे वेगळे करणे बाकी राहिले होते. बाकीचे सगळे शेतकरी कामाला लागले होते. कापणी झाली की शेतकरी खूप कामात असतात.

आपल्याला मजूर मिळावेत म्हणून मनसाने खूप प्रयत्न केले. पण त्याला कोणीच सापडेना. इथे आकाशात ढग जमा होऊ लागले होते. पाऊस आला तर सगळे धान्य खराब होण्याची भीती होती.


काही दिवसांनी एक सण होता. सर्व शेतकऱ्यांनी आपापली कामे बंद ठेवली. त्यामुळे गावातील बऱ्याच माणसांना त्या दिवशी सुट्टी होती.

मनसा त्या लोकांपाशी गेला. त्याने बऱ्याच विनवण्या केल्यानंतर पाच माणसे कामासाठी तयार झाली.




मनसाने घरी येऊन बायकोला सांगितले, ‘‘आज सणाचा दिवस आहे. ही माणसे आज कामाला आली आहेत. दुपारी त्यांच्यासाठी पुऱ्या कर.’’

अकराच्या सुमारास बायकोने चुलीवर कढई ठेवली. गोडे तेल कढईत ओतले आणि पुऱ्या लाटायला सुरुवात केली. काही पुऱ्या तयार झाल्या. इतक्यात मनसाचा मुलगा बुद्धू आला आणि लुडबुड करू लागला. त्याच्या नाकातला शेंबूड ओठावर उतरला होता.




आईने आपल्या पदराने बुद्धूचे नाक इतक्या जोरात पुसले की तो कुरुकुरत बाहेर निघून गेला. इतक्यात कढईतली पुरी करपू लागली.



पुरीला वाईट वाटले. बुद्धूच्या आईने तिला खूप वेळ तेलात ठेवल्यामुळे तिला खूप त्रास होत होता.

बुध्दूची आई लगबगीने पुरी परतायला गेली. चिडलेल्या पुरीने झटकन कढईतून उडी मारली आणि पळत पळत म्हणाली, ‘‘तू बस बुद्धूचे नाक पुसत. मी चालले.’’




बुध्दूच्या आईने तिला पकडण्याचा खूप प्रयत्न केला पण ती कुठली हाती यायला? पुरी सुळकन घरातून निघाली आणि शेताकडे पळू लागली.

वाटेत मनसा व त्याचे पाचही सहकारी मळणीसाठी बैल हाकत होते.





पुरी त्यांच्या बाजूने पळताना म्हणाली, ''मी कढईतून धप्कन् उडी मारली आणि बुद्धूच्या आईला चकवून पळाले. तुम्हाला पण मी सापडायची नाही. आहे का कोणाची तयारी ?''

हातातले काम तसेच टाकून शेतकरी पुरीच्या मागे पळाले. पण ती कुठली त्यांना सापडते ? धावून धावून दमलेले शेतकरी तसेच मागे फिरले.



8721







शेतातून निघालेल्या पुरीला माळावर एक ससा भेटला.

त्याला पाहताच पुरी म्हणाली, ‘‘मी तर कढईतून उडी मारून, बुद्धूच्या आईला चकवून आणि शेतकऱ्यांना दमवून आले आहे. इटुकल्या पिटुकल्या सशा, तुला पण मी हरवेन.’’

सशाने वेगाने पुरीचा पाठलाग केला. तो तिला पकडणारच होता इतक्यात ती एका बिळात शिरली. बिळात कोल्हा असावा या कल्पनेने ससा घाबरून तसाच मागे फिरला.

8721







खरोखरच कोल्हा जणू काही आतमध्ये पुरीची वाटच पाहत होता. पुरीला आत शिरताना पाहून कोल्हा पटकन उठला आणि मनात म्हणाला, ''आता आलीच आहेस तर जाशील कुठे?''

परंतु पुरी उलट्या पावली पुन्हा निघाली आणि पळत म्हणाली, ''मी तर कढईतून उडी, मारून बुद्धूच्या आईला चकवून, शेतकऱ्यांना दमवून आणि इटुकल्या पिटुकल्या सशाला हरवून आले आहे. कोल्ह्या, मी तुझ्यापण हाती लागणार नाही.''

कोल्हा म्हणाला, ‘‘कुठे चाललीस ? थांब, आता तुला चांगली अद्दल घडवतो.’’ पण पुरी मोठी वस्ताद होती. तिने एका शेतकऱ्याच्या घराच्या दिशेने पळायला सुरुवात केली जिथे कुत्रे राहत होते. आता कुत्रे असलेल्या ठिकाणी कोल्हा येईलच कसा ?


8721





शेतकऱ्याच्या घराजवळ एक भुकेली कुत्री तिच्या पाच पिल्लांसोबत इकडे तिकडे भटकत होती.


पुरी म्हणाली, "मी तर कढईतून उडी मारून, बुद्धूच्या आईला चकवून, शेतकऱ्यांना दमवून, सशाला हरवून आणि चतुर कोल्ह्याला फसवून आले आहे. लपलप बीबी तुलापण हरवेन."




कुत्री खूप हुशार होती. बोलू लागली, “तू काय म्हणालीस ग, छोट्या पुरीबाई ? मला जरा कमी ऐकू येते. थोडे जवळ येऊन सांगशील का ?”

पूरी जवळ आली आणि बहिऱ्यासारखे तोंड वळवले.

पूरी पुन्हा बोलू लागली, “मी तर कढईतून उडी मारून,” एवढेच बोलू शकली होती तेव्हा कुत्रीने चावा घेतला, “हप!”







तिच्या तोंडात अर्धी पूरी आली. उरलेल्या अर्ध्या पूरीने जोरात धूम ठोकली आणि जमिनीत शिरली. कुत्री तिला शोधून शोधून दमली पण पूरीचा कुठेच पत्ता लागला नाही.

कुत्रीने आपल्या पाचही पिल्लांना सांगितले की जरा पूरीला शोधा. त्या कुत्रीने आपल्या पिल्लांसोबत ती अर्धी पूरी शोधण्यात संपूर्ण आयुष्य घालवले, पण पुरी सापडेल तर शपथ.

अजूनही कुत्रे पुरीच्या शोधात जमीन हुंगत फिरत असतात की पुरीचा शोध लागला तर तिला बाहेर काढू.

त्या पुरीने आमच्या आजीला फसवले होते. पण त्या पुरीचा कुठेही पत्ता लागला नाही.





# जादूची किल्ली

जादूची किल्ली ही भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. झाकिर हुसेन यांनी मुलांसाठी सांगितलेल्या लोककथांची मालिका आहे. त्यांच्या मते, 'मुलांच्या हाती पडणारी पहिली पुस्तके म्हणजे त्यांना गवसणारी या दुनियेच्या जादुनगरीची किल्लीच!'

ही पुस्तके म्हणजे मराठीत अनुवादित झालेला एक आनंदाचा ठेवाच आहे. मोठ्याने वाचून दाखविण्यासाठी पालक आणि शिक्षक यांच्यासाठी ही पुस्तके अतिशय उपयुक्त आहेत. या पुस्तकांतील रंगीबेरंगी चित्रे आणि सुबोध मजकूर यांच्यामुळे मुलांना कल्पनाशक्तीच्या अद्भुत विश्वाची सहल घडेल.

या मालिकेतील इतर पुस्तके

**अब्बूखाँची बकरी**
**कधी गरम, कधी गार**
**कोंबडीचे आगळे वेगळे पिल्लू**
**गुल-ए-अब्बास**
**सईदाची अम्मा**

## जादूची किल्ली

जादूची किल्ली ही भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. झाकिर हुसेन यांनी मुलांसाठी सांगितलेल्या लोककथांची मालिका आहे. त्यांच्या मते, 'मुलांच्या हाती पडणारी पहिली पुस्तके म्हणजे त्यांना गवसणारी या दुनियेच्या जादूनगरीची किल्लीच!'

# पुरी गेली पळून

बुध्दूची आई बुध्दूचे नाक पुसण्यात इतकी मग्न होती की कढईत तळायला टाकलेली पूरी करपत आहे. हे तिच्या लक्षात आले नाही. ती छोटी पुरी खावे जाण्यासाठी थांबून राहिली? सर्वांना ताणे देत ती पळाली आणि कशी? शेतकरी आणि त्याचे मित्र, ससा आणि कोल्हा सर्वांना चकमा देत गेली. ती पकडली जाईल का?

Age Group : 11-14 yrs.
Poori Geli Paloon (Marathi)
Rs. 20

young zubaan

ISBN 81-89013-51-3